दिनेश
बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर,
वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368,
9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे सहसंपादक : तुकाराम कामठे

या गुढी पाडव्याला आपल्या घराला द्या नवीन आणि आधुनिक साज!
इंटेरिअर डिझायनर श्रेया निलाखे
घर, फ्लॅट व ऑफिससाठी आकर्षक आणि आधुनिक इंटेरिअर डिझाईन.

- आधुनिक व मिनिमल डिझाईन
- स्मार्ट स्पेस प्लॅनिंग
- बजेटमध्ये सुंदर इंटेरिअर सोल्युशन्स
संपर्क: 75-59-26-16-75

वर्ष ५ । अंक १९० । शुक्रवार १७ एप्रिल २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

## अभिषेक कळमकरवर कायद्याचा फास आवळला

### स्टँडिंग वॉरंटला दाद न दिल्याने जाहीरनामा प्रसिद्ध । संपत्ती जप्तीच्या दृष्टीने पाऊल पुढे

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** महिला अत्याचार गुन्ह्यातील पोलिसांना हवा असलेला आरोपी माजी महापौरअभिषेक बाळासाहेब कळमकर यास न्यायालयात हजर करण्यासाठी न्यायालयाने भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम ८४ प्रमाणे जाहीरनामा काढुन तो सार्वजनिक ठिकाणी दर्शनीय भागामध्ये प्रसिध्द करण्याबाबत आदेशित केले आहे. स्टँडिंग वॉरंटला दाद न दिल्याने कळमकरवर कायद्याचा फास आवळला जात असून संपत्ती जप्तीच्या दृष्टीने पुढचे पाऊल पडले आहे.

फिर्यादी तरुणीस नोकरीचे आमिष दाखवून अत्याचार केल्याप्रकरणी व त्याचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करून धमकावल्याप्रकरणी माजी महापौर तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचा शहर जिल्हाध्यक्ष अभिषेक कळमकर यांच्यावर दिनांक १८ फेब्रुवारी रोजी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झालेला आहे. माहिती तंत्रज्ञान कायद्याचे कदम असल्याने हा गुन्हा तोफखाना पोलीस ठाण्यात वर्ग झालेला आहे.

यानंतर कळमकर हा अद्याप पोलिसांच्या हाती



लागलेला नसून त्याच्यावर भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम ७५ प्रमाणे स्टँडिंग वॉरंट काढण्यात आले होते. सदर स्टँडीग वॉरंट अहिल्यानगर जिल्हा, तसेच महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यामध्ये पाठवून आरोपीचा शोध घेण्यात आला. परंतु तो मिळुन आला नाही. त्यानंतर आरोपीविरुध्द भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम ८४ प्रमाणे कार्यवाही होण्यासाठी न्यायालयास पत्रव्यवहार करण्यात आला असून न्यायालयाने आरोपीस हजर होणेबाबत भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम ८४ प्रमाणे जाहीरनामा काढुन तो सार्वजनिक ठिकाणी दर्शनीय भागामध्ये प्रसिध्द करण्याबाबत आदेशित केले आहे.

**काय म्हटले आहे जाहीरनाम्यात?**

**न्यायालयाने दिलेल्या जाहिरनाम्यामध्ये आरोपी अभिषेक बाळासाहेब कळमकर (रा. भुतकरवाडी चौक, सावेडी) यास तात्काळ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी कोर्ट नं. ०३ अहमदनगर यांचेसमक्ष हजर होण्याबाबत आदेश दिलेले असुन सदर आरोपी न्यायालयासमोर हजर न राहिल्यास त्यास फरार आरोपी म्हणून घोषीत करण्यात येणार असल्याचे नमूद केले आहे. आरोपी अभिषेक बाळासाहेब कळमकर यास न्यायालयासमक्ष हजर होण्याचे आवाहन करण्यात येत असून आरोपी हजर न झाल्यास त्याची संपत्ती जप्तीची कार्यवाही करण्यात येणार आहे.**

## शिर्डीतील हॉटेलमध्ये चोरी करणारा जेरबंद

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** शिर्डी येथील हॉटेलमधून टीव्ही व इतर साहित्य चोरणारा आरोपी जेरबंद करण्यात स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेला यश आले आहे. त्याच्याकडून मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. विशाल बाळू त्रिभुवन (वय-२६ वर्षे, रा. मल्हारनगर, निमगांव ता. राहाता) असे अटक आरोपीचे नाव आहे.

फिर्यादी विलास मारुती डोंगरे (रा. निसर्ग ग्रीन प्रकल्प बी. कँबीन रोड, अंबरनाथ पुर्व जि. ठाणे) यांचे हॉटेल साई पंचम (निमगाव ता. राहाता) येथे दिनांक २० मार्च ते १ एप्रिल या कालावधीत एलईडी टीव्ही, ३३ नळ, मिस्कर व इतर असा एकूण ४ लाख ३५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल चोरून नेला होता. याप्रकरणी शिर्डी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यावर गुन्हा दाखल आहे.

एलसीबी चे पथक या गुन्ह्याचा तपास करत असताना दिनांक १६ एप्रिल रोजी गोपनीय माहिती मिळाली की, सदर गुन्हा विशाल त्रिभुवन (रा. निमगाव ता. राहाता) याने त्याच्या साथीदारासोबत केला असून तो सध्या त्याच्या घरात आहे.

त्यानुसार पथकाने निमगाव शिवारातील राहत्या घरातून आरोपी विशाल त्रिभुवन याला अटक केली. त्याने साथीदार प्रमोद उर्फ बंड्या सुधाकर पवार (रा. दिल्ली साईट, साईबाबा संस्थान खोल्या शिर्डी ता.राहाता) याच्या सोबत मिळून हा गुन्हा केल्याची कबुली दिली. पोलीस बंड्याचा शोध घेत आहेत.

पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली पोसइ दीपक मेढे, व पोलीस अंमलदार राहुल द्वारके, फुरकान शेख, राहुल डोके, सुनिल मालणकर, प्रशांत राठोड, सतीश भवर यांच्या पथकाने ही कारवाई केली.

## संपदा पतसंस्थेच्या जप्त मालमत्तांच्या लिलावास प्रारंभ

### ठेवीदारांना दिलासा मिळण्याची चिन्हे; माळीवाडा व नेप्ती येथील मालमत्ता विक्रीतून लाखोंची वसुली

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** ठेवीदारांच्या कोट्यवधी रुपयांच्या ठेवी अडकून पडलेल्या संपदा नागरी सहकारी पतसंस्थेच्या प्रकरणात प्रशासनाने जप्त मालमत्तांच्या लिलावाद्वारे वसुलीची प्रक्रिया सुरू केली आहे. पतसंस्थेच्या संचालक मंडळाकडून ठेवींचा अपहार झाल्याचे निष्पन्न झाल्यानंतर शासनाने ही कठोर कारवाई हाती घेतली आहे.

आदेशानंतर लिलावाची अंमलबजावणी या प्रकरणी काही ठेवीदारांनी जिल्हा ग्राहक तक्रार निवारण न्यायमंचाकडे दाद मागितली होती. सुनावणीनंतर न्यायमंचाने




तत्कालीन चेअरमन ज्ञानदेव सबाजी वाफारे यांच्यासह सर्व संचालकांना दोषी धरत ठेवी व्याजासह परत करण्याचे आदेश दिले होते. या आदेशाच्या अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत तहसील कार्यालयाकडे वसुली प्रक्रिया सोपविण्यात आली. त्यानुसार नगर शहर व तालुक्यातील संचालकांच्या मालमत्तांची जप्ती करून लिलावाचा निर्णय घेण्यात आला.

**न्यायालयाचा आडकाठीला नकार**

दरम्यान, लिलाव प्रक्रियेला स्थगिती मिळविण्यासाठी संचालकांनी औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली होती. मात्र न्यायालयाने ही याचिका फेटाळून लावल्याने प्रशासनाच्या कारवाईला हिरवा कंदील मिळाला.

**माळीवाडा व नेप्ती येथील मालमत्तांची विक्री**

तहसीलदार संजय शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली लिलाव प्रक्रिया सुरू झाली. माळीवाडा येथील ज्ञानदेव वाफारे यांच्या नावे ■ पान ४ वर

## गोवंशाची कत्तल करणाऱ्या दोघांना कोतवाली पोलिसांकडून अटक

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** गोवंशीय जनावरांची कत्तल करुन मांस विक्री करणाऱ्या दोघांना कोतवाली पोलिसांनी मुद्देमालासह अटक केली.


दिनांक १६ रोजी कोतवालीचे पथक पेट्रोलिंग करीत असताना पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांना गोपनीय माहिती मिळाली की, झेंडीगेट व्यापारी मोहल्ला येथे गोवंशाची कत्तल करून मांस विकले जात आहे. त्यानुसार पथकाने छापा टाकला असता

समद बाबुलाल कुरेशी (वय- ५० वर्षे रा. बेपारी मोहल्ला, झेंडीगेट) व शफिक नुर कुरेशी (वय ५९, रा कसाई गल्ली सदर बाजार भिंगार) हे दोघे आढळून आले. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे, पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोसई प्रविण पाटील, पोसई गणेश देशमुख, तपासी अधिकारी पोहेकॉ राहुल शिंदे, मपोहेकॉ रोहिणी दरंदले, पोहेकॉ बाळकष्ण दौंड, पोहेको/विशाल दळवी, पोहेकॉ विनोद बोरगे,, पोहेकॉ साबीर शेख, पोकॉ सुरज कदम, पोकॉ दीपक रोहकले, सत्यम शिंदे, शिरीष तरटे, पोकॉ रमेश शिंदे पोकॉ अमोल गाडे, दत्तात्रय कोतकर, पोकॉ/अतुल काजळे, पोकॉ/अतुल लाटे, पल्लवी रोहकले यांच्या पथकाने केली.

## नगर तापले!

### सतर्कता बाळगण्याचे प्रशासनाचे नागरिकांना आवाहन



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** जिल्ह्यात उन्हाचा पारा दिवसेंदिवस चढत असून आता नगरकरांची लाहीलाही होत आहे. गेल्या तीन-चार दिवसांपासून उष्मा प्रचंड वाढला असून दुपारच्या वेळेस घराबाहेर पडणेही मुश्किल झाले आहे. भारतीय हवामान खात्याच्या इशाऱ्यानुसार अहिल्यानगर जिल्ह्यात तुरळक ठिकाणी उष्मालाटेची शक्यता वर्तविण्यात आली असून प्रशासनाने 'यलो अलर्ट' जारी केला आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी विशेष दक्षता घ्यावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी ■ पान ४ वर

## पाश्चात्यांच्या अंधानुकरणाने भारतीय संस्कार अन् संस्कृतीचा ऱ्हास होत चालला

### – वृंदावन निवासी परम श्रध्देय पूज्य श्री इंद्रेशजी उपाध्याय

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** पाश्चात्यांच्या अंधानुकरणाने भारतीय संस्कार अन् संस्कृतीचा ऱ्हास होत चालला आहे, असे प्रतिपादन वृंदावन निवासी परम श्रध्देय पूज्य श्री इंद्रेशजी उपाध्याय यांनी केले.

येथील श्रीमती कौशल्यादेवी गौरीशंकरजी गुप्ता, महेश गुप्ता आणि आयुष गुप्ता यांनी सावेडी मधील मिस्कीन मळ्यात आयोजित केलेल्या श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे चतुर्थ पुष्प गुंफताना ते बोलत होते.

सर्वश्री सुधीर झालानी, किसनलाल बंग व प्रदिप पंजाबी यांच्यासह शहरातील मान्यवर प्रतिष्ठित भाविक श्रोतृवृंदांच्या सेवेसाठी तत्पर आहेत.

पूज्य श्री इंद्रेशजी उपाध्याय पुढे म्हणाले, भारतीय संस्कार आणि संस्कृती चिरकालापासून चालत आली आहे. अलिकडे युवक-युवती पाश्चात्यांचे अंधानुकरण करू लागल्याने भारतीय संस्कार अन् संस्कृतीचा ऱ्हास होत



चालला आहे, हे थांबवणे आपल्या युवकांच्याच हाती आहे. भारतीय रितीरिवाज, संस्कार, परंपरा, संस्कृती जगदवंद्य ठरली. तरीही परदेशाचे आकर्षण का? असा सवाल करून ते पुढे म्हणाले, संपत्तीच्या संग्रहाचा हव्यास आपल्याला कधीही भगवत प्राप्ती करू देणार नाही. भगवंताच्या कथेतच आत्मशांती मिळेल. भगवंताच्या कथा, व्यासपीठ, आचार्य यांच्याबद्दल आपल्या मनात सदैव श्रध्दायुक्त निष्ठा असावी. भावुकता, नम्रता असावी. मंदिरात भगवंताचे दर्शन घेताना, ध्यान करताना, सत्संगात डोळ्यांमधून अश्रुधारा सुरू व्हाव्यात.

कोणत्याही भक्ताला आणि ब्राह्मणाला आपल्याकडून दु:ख होईल, असे कधीही वागू नये. भगवान श्रीकृष्ण आपल्यापासून दूर निघून जातील असे कोणतेही कर्म करू नये. धर्माचरण श्रध्देने करावे. भगवान श्रीकृष्णांच्या सर्व लिलांमध्ये संक्षिप्त ज्ञान लपलेले आहे ते शोधण्याचा प्रयत्न करावा. सर्व भाव आणि सर्व गुणांनी युक्त असा हा पुरूषोत्तम परमात्मा आपला होईल, असे वागावे.

सुदामा सारखे मित्र दुर्मिळ असतात. बाकी सर्व मित्र वेळ आली की, पळ काढणारेच असतात, हे सत्य ध्यानी घ्यावे. श्रीकृष्णांच्या ब्रजभूमीतील लिला अद् भूत आहेत. त्या उपदेशही करतात. भगवान श्रीकृष्णांना अती प्रिय असलेल्या वृंदावनात संपूर्ण एक दिवस घालवून श्रीकृष्ण लिलांचे स्मरण करत कृष्णमय होण्याचा आनंद जीवनात अवश्य लुटावा, असे आवाहन पूज्य श्री इंद्रेशजी उपाध्याय यांनी केले. गोवर्धन लिलेचे निरूपण करताना ५६ भोग सोहळा (अन्नकुट) करण्यात आला. हा सोहळा भाविकांचे विशेष आकर्षण ठरला.

उपस्थित हजारो स्त्री-पुरूष भाविकांना दर्जेदार सात्विक प्रसाद देण्याची सेवा सर्वश्री दिनेश अग्रवाल, सुदिप अग्रवाल आणि सागर अग्रवाल यांनी स्वयंस्फूर्तीने आणि श्रध्देने केली. त्यांना विनोद पटेल, राजूभाई पटेल, मिलिंद चवंडके, शिरीष तिवारी, पवन खंडेलवाल यांनी मोलाचे सहाय्य केले. प्रसाद वाटप समितीतील सदस्यांनीही परिश्रम घेतले. कडाक्याचे ऊन असूनही दिवसेंदिवस गर्दीचा उच्चांक होत चालला आहे.

## अक्षय तृतीयापर्यंत आंब्यांचे भाव येणार सर्वसामान्याच्या आवक्यात



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अनेक देशात आंतरराष्टीय बाजारपेठेत दळणवळणाचा प्रश्न उपस्थित झाल्याने निर्यात मंदावली .त्यात मध्यंतरी राज्यात झालेल्या अवकाळी पावसानी मोहर गळून पडला असून शेतकरी बांधवांचे मोठे नुकसान झालेले आहे.या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे एक्स्पोर्ट गुणवत्तेचा आंबा देखील भारतीय बाजारपेठेत विक्रीस उपलब्ध झालेला असून मालाला मात्र उठाव नाही.

यासर्व बाबींमुळे सर्वच आंब्याचे भाव आता सर्व सामान्याच्या आवाक्यात लवकर येत असल्याची माहिती नवीपेठेतील पप्पूशेठ पमनदास आहुजा फळ अढीचे संचालक अज्जुशेठ,कैलास वजगदीश आहुजा यांनी दिली. नैसगिक पध्दतीने पिकवलेले (ऑर्गनिक ) आंबे या आहुजा यांच्या फळअढी मध्ये उपलब्ध असुन गेल्या ५७ वर्षान पासुन हि फळअढी ग्राहकांच्या विश्वासास पात्र झाली आहे.

सध्या या फळ अ ढीमध्ये देवगड हापूस,रत्नागिरी हापूस.लालबाग, म्हैसूर, पायरी हे आंबे उपलब्ध असून देवगड हापूस २ डझन-१५००/-ते १८००/-रत्नागिरी २- डझन-१२००/- ते १४०० /-/हे भाव साईजनुसार आहेत.लालबाग आंबा -एक किलो-४००/- ते ५००/- म्हैसूर पायरी -एक किलो-३००/-ते ३५०/-असा असून अहिल्यानगरवासीयांनी या आंबा अढीस अवश्य भेट देऊन आंबे खरेदी करावेत व शुभ अश्या साडेतीन मुहुर्तापैकी एक अक्षय तृतीया या सणाचा आणखीन गोडवा वाढवावा,आंष्यांच्या स्वादाचा लुटावा. असे आवाहन केले आहे.

## दै. आकर्षण निवडक

### तपोवन केंद्रात श्री.स्वामी समर्थ यांची पुण्यतिथी उत्सवाची मोठ्या उत्साहात सांगता



अहिल्यानगर- सावेडी उपनगरातील नगर छत्रपती संभाजी - नगर रोडवरील तपोवन येथील श्री.स्वामी समर्थ महाराज यांची तपोवन केंद्रात पुण्यतिथी उत्सव सप्ताहाची सांगता महानैवेद्य महाआरती, महाप्रसादाने मोठ्या उत्साहात भक्तिमय वातावरणात झाली. सावेडी उपनगरात तपोवन रोड येथील तपोवन केंद्रात श्री.स्वामी समर्थ पुण्यतिथी उत्सव निमित्त भव्य पारायण सोहळा पार पडला. यावेळी २४९ महिलांनी सामूहिक श्री.गुरुचरित्र पारायण वाचन केले. गेले सात दिवस नित्यनियमाने पारायण सोहळा, अखंड नामजप, आरती असे धार्मिक कार्यक्रम पार पडले. दिंडोरी प्रणित गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली तपोवन केंद्रात वर्षभर विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन होते. बाल संस्कार वर्गामुळे देखील चांगले विद्यार्थी येथे घडत आहेत. येथील केंद्र प्रतिनिधी श्री.व सौ.सोनाली बबन पालवे यांच्या हस्ते महानैवेद्य अर्पण करून महाआरती करण्यात आली. याप्रसंगी नगरसेविका रोशनीताई त्र्यंबके, संध्याताई पवार,माजी नगरसेविका रूपालीताई वारे,आकाश त्र्यंबके आदींसह स्वामी समर्थ यांचे सेवेकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सप्ताह मध्ये महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. केंद्राचे काम पाहून भाविकांनी समाधान व्यक्त केले. महानैवेद्य आरती झाल्यावर महाप्रसादाचा लाभ भाविकांनी घेतला.

### स्व. आमदार अरुण काका जगताप यांच्या स्मरणार्थ पाणपोईचा उपक्रम

अहिल्यानगर - स्वर्गीय आमदार अरुण काका जगताप यांच्या स्मरणार्थ जगदंब मित्र मंडळ ट्रस्टच्या वतीने शहरात पाणपोईचा उपक्रम सुरू करण्यात आला. वाढत्या उन्हाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना दिलासा देणारा हा उपक्रम असून, समाजाप्रती असलेल्या बांधिलकीचे दर्शन घडवणारा ठरला आहे. या पाणपोईचे उद्घाटन माजी उपमहापौर गीतांजली काळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नगरसेविका पौर्णिमा विजय गव्हाणे, नगरसेवक बाली बांगरे, ट्रस्टचे संस्थापक राजू मगर, अध्यक्ष विजय दळवी, महेश नामदे, चंदू औशीकर, प्रशांत हातुरकर, विजय गायकवाड, संदीप शिंदे, अंबादास इंगळे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना नगरसेविका पौर्णिमा गव्हाणे म्हणाल्या की, सध्या उन्हाची तीव्रता मोठ्या प्रमाणात वाढली असून, अनेक नागरिकांना दिवसभरात पिण्याच्या पाण्याची मोठी अडचण भासत आहे. अशा परिस्थितीत सामाजिक भावनेतून राबवण्यात येणारे पाणपोईसारखे उपक्रम अत्यंत गरजेचे आहेत. तहानलेल्या नागरिकांना थंड पाणी उपलब्ध करून देणे ही केवळ सेवा नसून मानवतेचे जतन करणारी कृती आहे. त्या पुढे म्हणाल्या, ''जगदंब मित्र मंडळ ट्रस्टने घेतलेला हा उपक्रम इतरांसाठीही प्रेरणादायी आहे. प्रत्येकाने आपल्या परिसरात अशा छोट्या-छोट्या उपक्रमांची जबाबदारी घेतली, तर समाजातील अनेक समस्या सहज दूर होऊ शकतात. उन्हाळ्यातील कठीण परिस्थितीत अशा उपक्रमांमुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळतो, हे विशेष उल्लेखनीय आहे.''

### आनंदराव काकडे यांचे हृदयविकाराने निधन

अहिल्यानगर- तालुक्यातील जेऊर



बायजाबाई येथील रहिवासी आनंदराव बाबुराव काकडे यांचे नुकतेच हृदयविकाराने निधन झाले. ते ६५ वर्षांचे होते. जेऊर येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.यावेळी मोठा जनसमुदाय उपस्थित होता. त्यांच्यामागे पत्नी, मुलगा, सून, मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. अण्णा या नावाने ते सर्वांना परिचित होते. एस.टी. महामंडळाचे तारकपूर आगाराचे कंडक्टर कैलास काकडे यांचे ते वडील होत. त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ होत आहे.

# बीपीसीएल फाउंडेशनने शिर्डीत सौरऊर्जा प्रकल्प सुरू केला; १.७ मेगावॅट प्रकल्पामुळे ऊर्जा खर्चात बचत होणार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (बीपीसीएल), ही फॉर्च्युन ग्लोबल ५०० यादीतील कंपनी आणि महारत्न सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, आपल्या सीएसआर विभाग बीपीसीएल फाउंडेशनच्या माध्यमातून, श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट (), शिर्डी यांच्यासोबत भागीदारी करून, श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट च्या इमारतींवर १.७ मेगावॅट क्षमतेची ग्रिड–जोडलेली रूफटॉप सौर पीव्ही वीज निर्मिती प्रणाली उभारण्याचे काम हाती घेतले आहे. यामुळे शाश्वत ऊर्जा आणि समुदाय विकासाबाबतची त्यांची बांधिलकी अधिक दृढ झाली आहे.

या उपक्रमांतर्गत, बीपीसीएल फाउंडेशन ही अंमलबजावणी संस्था ) म्हणून कार्य करेल, तर एसएसएसटी, शिर्डी ही कार्यान्वयन संस्था म्हणून काम पाहणार आहे. या प्रकल्पासाठी एकूण ४,४५,२५,७५१ रुपये (जीएसटीसह) इतकी आर्थिक मदत देण्यात येणार असून, हा प्रकल्प १५ महिन्यांच्या आत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

या प्रकल्पातून स्व–उपभोग आणि नेट मीटरिंगद्वारे दरवर्षी सुमारे २६.९ लाख युनिट्स () वीज निर्मिती होण्याची अपेक्षा आहे. यामुळे दरवर्षी सुमारे रुपये २.५६ कोटींची लक्षणीय बचत होईल, तसेच कार्बन फूटप्रिंट कमी करण्यास आणि ऊर्जा कार्यक्षमता वाढविण्यासही मदत होईल. या उपक्रमाचा लाभ शिर्डी येथील एसएसएसटीमध्ये अनुदानित निवास सुविधांचा लाभ घेणाऱ्या १० लाखांहून अधिक भक्तांना होणार आहे.

बीपीसीएल फाउंडेशन आणि एसएसएसटी, शिर्डी यांच्यात औपचारिक सामंजस्य करार () मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला.



यामध्ये मा. खासदार भाऊसाहेब वाकचौरे तसेच एसएसएसटीचे वरिष्ठ अधिकारी सीईओ गोरक्ष गाडीलकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी भीमराव दराडे, कार्यकारी अभियंता भिकन दाभाडे, मुख्य लेखाधिकारी मंगला वराडे, प्रशासकीय अधिकारी संदीपकुमार भोसले आणि उपकार्यकारी अभियंता (विद्युत) किशोर गवळी यांचा समावेश होता.

सामंजस्य करारावर () सुश्री बीना मानसुख, महाव्यवस्थापक (प्रशासन सेवा, सुविधा व सीएसआर ), कॉर्पोरेट कार्यालय तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, बीपीसीएल फाउंडेशन, आणि श्री गोरक्ष गाडीलकर, मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी यांनी स्वाक्षऱ्या केल्या.

या प्रसंगी बीपीसीएल आणि बीपीसीएल फाउंडेशनचे सिनियर ऑफिसियल्स देखील उपस्थित होते. यामध्ये श्री देवेंद्र जोशी, जीएम (ॲडमिन सर्व्हिसेस) तसेच सीएसआरची ॲडिशनल चार्ज; श्री राजेश टिके, डीजीएम फायनान्स (सीएसआर); श्री संजय यादव, डीजीएम (सीएसआर); श्री मुकेश मुनेश्वर, असिस्टंट एक्झिक्युटिव (सीएसआर) व सेक्रेटरी, बीपीसीएल फाउंडेशन; श्री एन. मेघनाथन, डिप्टी जनरल मॅनेजर (एचआरएस); श्री अभिजीत चव्हाण, स्टेट हेड (रिटेल), महाराष्ट्र; श्री महेश एम, टेरीटरी मॅनेजर (एलपीजी), नाशिक; श्री राजकुमार मिश्रा, मॅनेजर सेल्स (एलपीजी), अहमदनगर; श्री मनोज जाधव, टेरीटरी मॅनेजर, अहमदनगर; तसेच श्रीमती हर्षा बिदावटका, सेल्स ऑफिसर, शिर्डी यांचा समावेश होता.

ही इनिशिएटिव्ह बीपीसीएलच्या क्लीन एनर्जी अडॉप्शनला प्रोत्साहन देण्याच्या आणि मीनिंगफुल पार्टनरशिप्सच्या माध्यमातून सस्टेनेबल इम्पॅक्ट निर्माण करण्याच्या सातत्यपूर्ण फोकसला अधोरेखित करते, तसेच भारताच्या रिन्यूएबल एनर्जी गोल्समध्ये योगदान देते.

भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. (बीपीसीएल) बद्दल: फॉर्च्युन ग्लोबल ५०० कंपनी असलेली भारत पेट्रोलियम ही भारतातील दुसरी सर्वात मोठी ऑइल मार्केटिंग कंपनी असून देशातील एक इंटिग्रेटेड एनर्जी कंपनी आहे. ही कंपनी क्रूड ऑइलचे रिफायनिंग आणि पेट्रोलियम प्रॉडक्ट्सचे मार्केटिंग करते तसेच ऑइल आणि गॅस इंडस्ट्रीच्या अपस्ट्रीम आणि डाउनस्ट्रीम सेक्टर्समध्ये कार्यरत आहे. कंपनीला प्रतिष्ठित महारत्न स्टेटस प्राप्त झाले असून त्यामुळे तिला अधिक ऑपरेशनल आणि फायनान्शियल ऑटोनॉमी मिळाली आहे.

भारत पेट्रोलियमच्या मुंबई, कोची आणि बीना येथील रिफायनरीजची एकत्रित रिफायनिंग कॅपॅसिटी सुमारे ३५.३ एमएमटीपीए आहे. कंपनीच्या मार्केटिंग इन्फ्रास्ट्रक्चरमध्ये इंस्टॉलेशन्स, डिपोज, फ्युएल स्टेशन्स, एव्हिएशन सर्व्हिस स्टेशन्स आणि एलपीजी डिस्ट्रीब्युटर्सचे विस्तृत नेटवर्क आहे. यामध्ये २५,३००+ फ्युएल स्टेशन्स, १०००+ सीएनजी स्टेशन्स, ६,२५०+ एलपीजी डिस्ट्रीब्युटरशिप्स, ४४०+ ल्यूब्स डिस्ट्रीब्युटरशिप्स, ८१ पीओएल स्टोरेज लोकेशन्स, ५६ एलपीजी बॉटलिंग प्लांट्स, ८१ एव्हिएशन सर्व्हिस स्टेशन्स, ५ ल्यूब ब्लेंडिंग प्लांट्स आणि ६ क्रॉस–कंट्री पाइपलाइन्स यांचा समावेश आहे.

भारत पेट्रोलियम आपली स्ट्रॅटेजी, इन्व्हेस्टमेंट्स तसेच एन्व्हायर्नमेंटल आणि सोशल ॲम्बिशन्स यांचे एकत्रीकरण करून सस्टेनेबल प्लॅनेटच्या दिशेने वाटचाल करत आहे. कंपनीकडे ६८००+ फ्युएल स्टेशन्सवर इलेक्ट्रिक व्हेइकल चार्जिंग स्टेशन्स उपलब्ध आहेत. सस्टेनेबल सोल्यूशन्सवर लक्ष केंद्रित करून कंपनी २०४० पर्यंत नेट झिरो एनर्जी कंपनी बनण्यासाठी रोडमॅप आणि इकोसिस्टम विकसित करत आहे (स्कोप १ आणि स्कोप २ एमिशन्ससाठी).

भारत पेट्रोलियम विविध कम्युनिटीजसोबत भागीदारी करून शिक्षण, पाणी संवर्धन, स्किल डेव्हलपमेंट, हेल्थ, कम्युनिटी डेव्हलपमेंट, कॅपॅसिटी बिल्डिंग आणि एम्प्लॉयी व्हॉलंटियरिंग यांसारख्या क्षेत्रांत उपक्रम राबवत आहे. 'एनर्जायझिंग लाइव्हस' हा कंपनीचा मुख्य उद्देश असून टॅलेंट, इनोव्हेशन आणि टेक्नॉलॉजीचा उपयोग करून जागतिक स्तरावर आदरणीय एनर्जी कंपनी बनण्याचे तिचे व्हिजन आहे.

# प्रामाणिकतेचा उज्ज्वल आदर्श; शाखाधिकारी बाबासाहेब गागरे यांचे सर्वत्र कौतुक



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** जिल्हा सहकारी बँकेच्या खडकवाडी शाखेत प्रामाणिकपणाचे प्रेरणादायी उदाहरण समोर आले आहे. शाखाधिकारी बाबासाहेब गागरे यांनी लॉकरमध्ये विसरलेल्या सुमारे दोन तोळ्यांच्या सोन्याच्या बांगड्या शोधून त्या संबंधित खातेदार कुटुंबाला प्रामाणिकपणे परत केल्या.

खोसे कुटुंबीयांनी यात्रेनिमित्त लॉकरमधील सोन्याच्या वस्तू काढल्या होत्या. मात्र, गडबडीत दोन तोळ्यांच्या बांगड्या बँकेतच राहून गेल्या. ही बाब लक्षात येताच शाखाधिकारी गागरे यांनी तत्काळ सीसीटीव्हीच्या मदतीने तपास सुरू केला. संबंधित खातेदारांचा शोध घेत त्यांनी बांगड्या सुरक्षितपणे परत केल्या.

बांगड्या परत मिळाल्याने खातेदार बाळासाहेब खोसे व रोहिणी खोसे यांनी समाधान व्यक्त करत गागरे यांच्या प्रामाणिकपणाचे मनापासून कौतुक केले. यावेळी प्रसाद कर्नावट, प्रवीण तांबे, रोखपाल अर्चना झावरे, मच्छिंद्र खामकर आदी उपस्थित होते.

आजच्या काळात अशा प्रामाणिक अधिकाऱ्यांची समाजाला नितांत गरज आहे. बाबासाहेब गागरे यांनी आपल्या कर्तव्यदक्षतेतून एक आदर्श निर्माण केला असून त्यांच्या या कार्याबद्दल सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# दादेगांव जहाँगीर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** जिल्हा परिषद शाळा दादेगांव जहाँगीर (नवीन) येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष श्री. आकाश ताकवले हे होते. यावेळी समिती सदस्य विनोद वाव्हळ, गावातील प्रतिष्ठित नागरिक तसेच विलास बापू भुमरे यांचे समर्थक भागवत भोसले यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यानंतर उपस्थित मान्यवरांनी बाबासाहेबांच्या कार्याचा आणि विचारांचा गौरव करत विद्यार्थ्यांना त्यांच्या आदर्शांचे पालन करण्याचे आवाहन केले.

शाळेचे मुख्याध्यापक श्री. राजेंद्र दहिफळे यांनी प्रास्ताविकात बाबासाहेबांच्या शिक्षणप्रेमी आणि समाजसुधारक कार्याचा आढावा घेतला. यावेळी सहशिक्षक काळे सर तसेच इतर शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमामुळे शाळेत प्रेरणादायी आणि उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले होते.

# टंचाई व विकासकामांवर आमदार दातेंची आढावा बैठक

## पंचायत समिती पारनेर येथे बैठक

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पारनेर–** पारनेर पंचायत समितीच्या सभागृहात टंचाई व विविध विकासकामांची आढावा बैठक पारनेर–नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात व शिस्तबद्ध वातावरणात पार पडली. गटविकास अधिकारी दिलीप सोनकुसळे यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीत तालुक्यातील विविध विभागांच्या कामांचा सखोल आढावा घेत प्रशासनाला अधिक गतिमान व लोकाभिमुख करण्यासाठी महत्त्वपूर्ण सूचना देण्यात आल्या. विविध लोकप्रतिनिधी, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीत जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या कामांबाबत आमदार दाते यांनी स्पष्टपणे सांगितले की, कोणत्याही परिस्थितीत कामाच्या गुणवत्तेत तडजोड होणार नाही. नागरिकांच्या तक्रारी आल्यास संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष स्थळी जाऊन तपासणी करून तत्काळ तोडगा काढावा, तसेच सर्व कामे वेळेत पूर्ण व्हावीत यासाठी काटेकोर नियोजन करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या कामांचा आढावा घेताना जलजीवन मिशन अंतर्गत सुरू असलेल्या योजनांची प्रत्यक्ष पाहणी करून ग्रामस्थांच्या तक्रारी जाणून घेण्याचे आदेश देण्यात आले. अपूर्ण कामांना पूर्णत्वाचा दाखला देऊ नये, तसेच १ जूनपर्यंत संपूर्ण अहवाल सादर करण्याचे निर्देश देत योजनांची गुणवत्ता व पारदर्शकता राखण्यावर त्यांनी भर दिला. त्याचबरोबर लघु पाटबंधारेची कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याबाबतही सूचना देण्यात आल्या.

घरकुल योजनांच्या आढाव्यात प्रधानमंत्री आवास, रमाई, शबरी आदी योजनांतील अपूर्ण घरे तातडीने पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले. लाभार्थ्यांशी थेट संवाद साधून कामे गतीने पूर्ण करण्याचे निर्देश देताना आमदार दाते यांनी नुकत्याच पार पडलेल्या अधिवेशनात त्यांनी मांडलेल्या मागणीचा उल्लेख केला आणि राज्य शासनाने घरकुल अनुदानात ५० हजार रुपयांची वाढ केल्याची महत्त्वाची माहिती दिली. या निर्णयामुळे ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

याशिवाय 'लाडकी बहिण' योजनेतील अपूर्ण ई–केवायसीसाठी विशेष शिबिरे आयोजित करण्याचे, आरोग्य विभागाने लसीकरण मोहिम वेळेत पूर्ण करण्याचे तसेच पशुसंवर्धन विभागाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना त्वरित भरपाई देण्याचे निर्देश देण्यात आले. स्वच्छ भारत मिशन अंतर्गत प्रलंबित कामे तात्काळ पूर्ण करण्यासाठी ठेकेदारांवर कठोर कारवाई करण्याचा इशाराही त्यांनी दिला. तालुक्यातील पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर सध्या सुरू असलेल्या टँकर पाणीपुरवठ्याचा आढावा घेत कायमस्वरूपी उपाययोजनांवर भर देण्याच्या सूचना करण्यात आल्या. रोजगार हमी योजनेतील कामांना गती देऊन अधिकाधिक नागरिकांना लाभ मिळावा, यासाठी प्रशासनाने सक्रिय भूमिका घ्यावी असेही त्यांनी सांगितले.

यावेळी भाजपचे नेते विश्वनाथ कोरडे, तालुकाध्यक्ष विक्रम कळमकर, सुषमा रावडे, सचिन भाऊ वराळ, सुनील थोरात, सोनाली सालके, सुभाष दुधाडे, नगरसेवक पै. युवराज पठारे, अशोक चेडे, सरपंच डॉ. नितीन रांधवन, अपर्णा खामकर, राजेंद्र उबाळे, विठ्ठल कवाद, रोहिदास लामखडे, स्वप्नील ठुबे, राजेंद्र ठुबे, विस्तार अधिकारी कैलास जगताप, संजय जगताप, बाळासाहेब मेहेत्रे, प्र. उप अभियंता किरण जाधव, उप अभियंता अंकुश पावसे, आरोग्य अधिकारी डॉ. प्रकाश कांबळे, शाखा अभियंता सचिन रामदिन, पशुधन विकास अधिकारी डॉ. स्नेहल गवारे, बालविकास अधिकारी दिपक मेहेत्रे, कमल राऊत, कृषी अधिकारी बाळासाहेब रासकर, मनिषा शिंदे, विस्तार अधिकारी राठोड, तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत अधिकारी, टंचाई विभाग प्रमुख किशोर शिंदे, रोजगार हमी विभाग सुमित बोरुडे, कारखिले इ. मान्यवर उपस्थित होते.

# लेझिमच्या ठेक्यावर भीम जयंतीचा जल्लोष; चिमुकल्यांचे दमदार सादरीकरण

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त ज्ञानदीप फाउंडेशनच्या विद्यार्थ्यांनी पारंपारिक लेझिम पथकाच्या माध्यमातून बाबासाहेबांना अनोखे अभिवादन केले. या मिरवणुकीत चिमुकल्या विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवत भीम गीत व छत्रपती शिवाजी महाराजांच्या गीतांवर लेझिमचे आकर्षक डाव सादर केले.

विद्यार्थ्यांच्या जोशपूर्ण सादरीकरणाने संपूर्ण वातावरण भारावून गेले होते. त्यांच्या कलागुणांना उपस्थित नागरिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद देत प्रोत्साहन दिले. यावेळी



नगरसेवक सुरेश बनसोडे यांनी सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांचे स्वागत केले. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष पंकज लोखंडे, संचालिका प्राजक्ता लोखंडे, जयश्री गायकवाड, विठ्ठल उमाप, ज्योती साठे, राजू डोईफोडे, राजेंद्र लोखंडे, अमित लोखंडे, प्राजक्ता लोखंडे, नितीन साठे, पूजा लोखंडे, राजू उमाप, जावेद सय्यद, दिलशाद अन्सारी, रमेश लोखंडे, अनिल डोईफोडे, क्लेरा डोईफोडे, जॉन्सन लोखंडे, प्रशांत लोखंडे, सिद्धी ओहोळ, रेखा गायकवाड, प्रगती गायकवाड, प्रियंका जाधव, अक्षय लोखंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

नगरसेवक सुरेश बनसोडे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले संविधान हे देशाच्या प्रगतीचे अधिष्ठान आहे. आजची तरुण पिढी आणि विद्यार्थी त्यांच्या विचारांपासून प्रेरणा घेत आहेत. ज्ञानदीप फाउंडेशनच्या विद्यार्थ्यांनी लेझिमच्या माध्यमातून दिलेले सादरीकरण हे केवळ कला नसून, बाबासाहेबांप्रती असलेला आदर आणि अभिमान व्यक्त करणारे आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव आणि संस्कार वृद्धिंगत होत असल्याचे त्यांनी सांगितले.

पंकज लोखंडे म्हणाले की, भीम जयंती हा केवळ उत्सव नसून तो सामाजिक परिवर्तनाचा संदेश देणारा दिवस आहे. ज्ञानदीप फाउंडेशनच्या माध्यमातून आम्ही विद्यार्थ्यांमध्ये संविधानाबद्दल जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहोत. येत्या १७ ते १९ एप्रिल दरम्यान बोल्हेगाव येथे आयोजित 'संविधान जागर अभियान' हे समाजातील सर्व घटकांना एकत्र आणणारे ठरेल. सांस्कृतिक कार्यक्रम, भीम गीत व स्पर्धांद्वारे बाबासाहेबांचे विचार जनमानसात रुजविण्याचा आमचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. ※संपादक – विजय शामराव सांगळे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### नेत्रदूत जालिंदर बोरुडे कोल्हापूरमध्ये महात्मा फुले राष्ट्रीय सन्मान पुरस्काराने सन्मानित



अहिल्यानगर - सामाजिक कार्यकर्ते तथा 'नेत्रदूत' म्हणून ओळख असलेले जालिंदर बोरुडे यांना कोल्हापूर येथील सत्यशोधक प्रागतिक मंच निर्मिती विचार मंचच्या वतीने 'महात्मा फुले राष्ट्रीय सन्मान पुरस्कार-२०२६' प्रदान करण्यात आला.भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त राजर्षी शाहू स्मारक भवन, दसरा चौक, कोल्हापूर येथे आयोजित कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. कोल्हापूरचे माजी आमदार ऋतुराज पाटील यांच्या हस्ते बोरुडे यांना सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमास कोल्हापूरचे उपमहापौर भुपाल शेटे, मंचाचे अध्यक्ष आदित्य म्हमाने, सचिव अंतिमा कोल्हापूरकर, डॉ. वसंत भागवत, डॉ. मिनल राजहंस, इंजि. अभिजीत कांडेकर, इंजि. यश घोगरे, इंजि. सौरभ बोरुडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.ऋतुराज पाटील म्हणाले की, ''जालिंदर बोरुडे यांचे कार्य हे समाजासाठी प्रेरणादायी आहे. त्यांनी गेल्या अनेक वर्षांपासून निस्वार्थ भावनेने नेत्रसेवा करत हजारो लोकांना नवजीवन दिले आहे. फिनिक्स सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून त्यांनी केलेले कार्य हे खऱ्या अर्थाने महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे प्रत्यक्ष उदाहरण आहे. समाजातील दुर्बल घटकांसाठी अशा प्रकारे काम करणारे व्यक्तिमत्व अत्यंत दुर्मिळ असल्याचे त्यांनी सांगित. कोल्हापूरचे उपमहापौर भुपाल शेटे म्हणाले की, जालिंदर बोरुडे यांचे कार्य हे समाजासाठी दीपस्तंभासारखे आहे. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन अधिकाधिक युवकांनी सामाजिक कार्यात सहभागी होण्याचे त्यांनी आवाहन केले.

### २१ एप्रिल रोजी मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया, नेत्र व आरोग्य तपासणी शिबिर

अहिल्यानगर - भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या निमित्ताने दिनांक २१ एप्रिल २०२६ रोजी दिल्ली गेट येथील शमी गणपती समोर, अहिल्यानगर येथे सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालयाच्या वतीने मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया तसेच नेत्र व आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आल्याची माहिती नेत्रचिकित्सक डॉ. आनंद किशोर बोज्जा यांनी दिली. या शिबिरामध्ये नागरिकांसाठी संपूर्णपणे मोफत सेवा उपलब्ध करून देण्यात येणार असून, मोफत नेत्र तपासणी, मोतीबिंदू (कॅटरॅक्ट) निदान व शस्त्रक्रियेबाबत मार्गदर्शन, तसेच रक्तदाब (बीपी) व मधुमेह (शुगर) तपासणी केली जाणार आहे. अनुभवी तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करून रुग्णांना आवश्यक ते वैद्यकीय सल्ले दिले जाणार आहेत.विशेष म्हणजे, ज्या रुग्णांमध्ये मोतीबिंदू आढळून येईल, अशा रुग्णांसाठी पुणे येथील एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालय येथे शस्त्रक्रियेसाठी येण्या-जाण्याचा संपूर्ण खर्च मोफत करण्यात येणार आहे.

### माळीवाडा येथील श्रीमती गयाबाई पांडुरंग निरफराके यांचे निधन

अहिल्यानगर- माळीवाडा येथील रहिवासी



श्रीमती गयाबाई पांडुरंग निरफराके यांचे नुकतेच दु:खद विधान झाले मृत्यू समयी त्यांचे ८० वय होते .त्याचे मागे दोन मुले ,सुना ,नातवंडे ,असा परिवार आहे .श्रीमती गयाबाई निरफराके या भाजीपाला विक्री चा व्यवसाय करून आपल्या कष्टाने मुलांचे संगोपन करून त्यांना मोठे केले त्यांना भजनाची विशेष आवड होती तसेच स्नायडर इलेक्ट्रिक येथील राजेश निरफराके आणि पुणे येथील किर्लो स्कर न्यूमॅटिक येथील गणेश निरफराके यांच्या मातोश्री होत्या .त्यांच्या निधनामुळे सर्वत्र हळहळ केली जात आहे.

## भारतातील वृध्दाश्रम आणि अनाथालय पूर्णपणे बंद झाल्यावरच भारत विश्व गुरु होईल

**- वृंदावन निवासी परम श्रध्देय पूज्य श्री इंद्रेशजी उपाध्याय**





**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आपल्या भारत देशामधील वृध्दाश्रम आणि अनाथालय पूर्णपणे बंद झाल्यावरच भारत विश्व गुरू होईल, असे प्रतिपादन वृंदावन निवासी परम श्रध्देय पूज्य श्री इंद्रेशजी उपाध्याय यांनी केले.

येथील श्रीमती कौशल्यादेवी गौरीशंकरजी गुप्ता, महेश गुप्ता आणि आयुष गुप्ता यांनी सावेडी मधील मिस्कीन मळ्यात आयोजित केलेल्या श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे व्दितीय पुष्प गुंफताना ते बोलत होते.

सर्वश्री सुधीर झालानी, किसनलाल बंग, प्रदिप पंजाबी यांच्यासह शहरातील मान्यवर प्रतिष्ठित भाविक येथील अलोट गर्दीवर नियंत्रण ठेवत उपस्थित सर्वांना कथा सोहळ्याचा आनंद मिळवून देण्यासाठी अथक परिश्रम घेताना दिसत आहेत.

पूज्य श्री इंद्रेशजी उपाध्याय पुढे म्हणाले, आई-वडिलांची सेवा करताना प्रत्यक्ष पांडुरंग आले तरी सेवेत खंड पडू न देता भक्त पुंडलिकाने पांडुरंगाला थांबायला सांगितले. आई-वडिलांच्या सेवेने भगवंत प्रसन्न होतो, हे पुंडलिकाने दाखवून दिले तरीही करिअरच्या नावाखाली आई-वडिलांना वृध्दाश्रमात ठेवणारी मुलं आहेतच! बाळ जन्माला आल्यावर त्याला अनाथालयात पोहोचवणारे माता-पिता आहेतच! ही वस्तुस्थिती मनाला प्रचंड वेदना देणारी आहे.

आपली वाणी, बुद्धी अपवित्र होऊ शकते. मात्र आत्मा सदैव पवित्र असतो. भगवंताच्या कथा ऐकताना मन तल्लीन होऊ लागले तर समजावे भगवान श्रीकृष्ण प्रसन्न होणार आहेत. श्रीकृष्णांचा प्रभाव सगळ्यांना जाणवतो. भक्तांचा भाव पाहून भगवंत प्रसन्न होतात. आपले शारीरिक, बौद्धिक, मानसिक, पारिवारिक ताप कथा श्रवणाने निघून जातात. शरिरातील रोम-रोम पुलकित होतो. आपल्या शरीरात रक्त नव्हे तर कृष्ण नावाची धारा वाहते, असे वाटते. श्रीकृष्णांचे नामामृत पिल्यावर साक्षात श्रीकृष्णाची भेट होतेच, असा विश्वास पूज्य श्री इंद्रेशजी उपाध्याय यांनी व्यक्त केला.

ते पुढे म्हणाले, भगवान श्रीकृष्णाची प्रेमयुक्त, श्रध्दायुक्त भक्ती करा. निस्वार्थ भावनेने केलेली भक्ती भगवंतापर्यंत पोहोचवते. आपले मन, चित्त, वृत्ती, कान, डोळे असे सर्वच शरीर एकाग्र होऊ लागले की, आपण भगवंताजवळ पोहोचू लागलो आहोत, हे लक्षात घ्या.

ज्यांना मुगल बादशहा थरथर कापत होते त्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या डोळ्यातून सत्संगात अश्रू ओघळत. गोकुळातील गोपी संसार विसरत. पंढरपूरात संत नामदेवांच्या संकीर्तनात प्रत्यक्ष विठ्ठल नाचत. माया म्हणजे संसार आणि परमात्मा म्हणजे भक्ती हे दोन्हीही वेगवेगळे आहे हे लक्षात घेऊन डोळे मिटले की, डोळ्यांसमोर पंढरीनाथ उभे रहातात, असे पूज्य श्री इंद्रेशजी उपाध्याय यांनी सांगितले. भज रे हरी का नाम या सुमधुर भक्तीगाताने सर्वांना हरिनामात तल्लीन होण्याचा आनंद मिळवून दिला.

## शंकर महाराज पालखी सोहळ्याचे प्रस्थान उद्या सायंकाळी होणार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सद्गुरू शंकर महाराज समाधी सोहळ्यानिमित्ताने अहिल्यानगर ते धनकवडी (पुणे) पायी पालखी दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी शंकरलिला परिवाराचे केडगाव येथील सद्गुरू विजयनाथ केदारी महाराज यांच्या मार्गदर्शनात उद्या शनिवारी (दि. १८) रोजी निघत आहे. ही यात्रा शुक्रवारपर्यंत (दि. २४) होणार आहे. यावर्षी या पालखीचे हे नववे वर्ष आहे, अशी माहिती भक्तमंडळीकडून देण्यात आली.

''तुम्हा पहाणे तुम्हांस स्मरणे घेणे दर्शन भाग्यविण, या गोष्टी सार्या येतीन घडून धरले आम्ही भावे तुमचे जगी घट्ट चरण सोडणार नाही. कधी आम्ही आले जरी मरण'' अशा भावनेतून ही भक्तमंडळी या यात्रेस मोठ्या संख्येने निघाली आहेत. ही पायी पालखी अहिल्यानगर, चास, सुपा, शिरूर, रांजणगाव गणपती, कोंढापुरी, वाघोली, चंदननगर, हडपसर बायपास मार्गे श्री सद्गुरू शंकर महाराज मठ, धनकवडी (पुणे) येथे पोहोचणार आहे.

पालखीचा कार्यक्रम याप्रमाणे : शनिवार दि. १८ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता श्रीस्वामी समर्थ मंदिर, डी. एड्. कॉलेज, दिल्लीगेट येथून प्रस्थान करणार आहे. दिल्लीदरवाजा मार्गे चौपाटी कारंजा, दत्त मंदिर, चितळे रोड येथून तुळजाभवानीमाता मंदिर, सबजेल चौक, केडगाव येथे भंडारी यांच्याकडे भोजन व मुक्काम.

अक्षय्यतृतीया, रविवार दि. १९ एप्रिल रोजी सकाळी ६ वा. केडगाव मार्गे, कामरगांव, भंडारी परिवाराकडून भोजन आणि श्री. जंगम यांच्याकडे विश्रांती.

सोमवार दि. २० एप्रिल रोजी वाघुंडे येथून प्रस्थान एमआयडीसी, जातेगाव मार्गे वाडेगव्हाणला दुपारी विश्रांती. शिरूर येथे लुंकड यांच्याकडून रात्रीचे भोजन व रात्रीचा मुक्काम.

मंगळवार दि. २१ एप्रिल रोजी रांजणगाव मंदीर दर्शन, कोडापुरीला किसन चव्हाण परिवार यांच्यातर्फे भोजन व निवास.

बुधवार दि. २२ एप्रिल रोजी शिक्रापूर येथून कोरेगांव भिमा येथे ढाकलिया परिवारातर्फे भोजन, रात्री वाघोलीला अजित शेवाळे यांच्यातर्फे भोजन व मुक्काम.

गुरुवार दि. २३ एप्रिल रोजी साकोरे यांच्याकडे दुपारचे जेवण व विश्रांती. तेथून धनकवडी मठाकडे प्रस्थान. नंतर वैभव जवाहिरे यांच्या निवासस्थानी भोजन व मुक्काम.

शुक्रवार दि. २४ एप्रिल रोजी श्रींना अभिषेक व दुपारी १२ ते ३ शंकर गीता पारायण (वैभव जवाहिरे यांच्या निवासस्थानी भोजन व मुक्काम) दुपारी महाप्रसाद.

या भव्य-दिव्य पायी पालखी सोहळ्यामध्ये मोठ्या प्रमाणात शंकर भक्तांनी सहभागी व्हावे, असे आवाहन शंकरलिला परिवाराचे सद्गुरू विजयनाथ केदारी महाराज आणि निलीमा केदारी यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : केदारी (मोबाईल ९२२६९००००३), अमित थोरात (मोबाईल ९५१११९५०४०), श्रीपाद तांबोळी, अहिल्यानगर. (मोबाईल ९३७०७४३५१५).

## आमदार दातेंच्या हस्ते ५०० हून अधिक बांधकाम कामगारांना प्रमाणपत्र वाटप



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर –** पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघातील कष्टकरी बांधकाम कामगारांच्या हक्कांना बळ देणारा महत्त्वपूर्ण उपक्रम आज पार पडला. आमदार काशिनाथ दाते यांच्या शुभहस्ते पारनेर तालुक्यातील पाचशेहून अधिक बांधकाम कामगारांना अधिकृत बांधकाम कामगार प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे कामगारांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा थेट लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

यावेळी आमदार दाते यांनी उपस्थित कामगारांना मार्गदर्शन करत बांधकाम कामगारांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची सविस्तर माहिती दिली. यात अपघात विमा योजना, आरोग्य सहाय्य योजना, मुलांच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, प्रसूती लाभ योजना, घरकुल सहाय्य, साधनसामग्री खरेदीसाठी अनुदान, वृद्धापकाळ निवृत्ती वेतन, तसेच कामगारांच्या कुटुंबासाठी विविध आर्थिक सहाय्य योजनांचा समावेश असल्याचे त्यांनी सांगितले. या योजनांचा लाभ प्रत्येक पात्र कामगारापर्यंत पोहोचावा यासाठी जनजागृती होणे अत्यंत आवश्यक असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

याप्रसंगी आमदार दाते यांनी सांगितले की, ''बांधकाम कामगार हा विकासाचा खरा शिल्पकार आहे. त्याच्या कष्टाचा सन्मान होणे ही शासनाची आणि समाजाची जबाबदारी आहे. शासनाच्या योजनांचा लाभ प्रत्येक कामगारापर्यंत पोहोचवण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत.''

तसेच मतदारसंघातील बांधकाम कामगारांना या योजना प्रभावीपणे उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या राज्य शासनाचे त्यांनी मनापासून अभिनंदन केले. यामध्ये महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, संबंधित विभागाचे मंत्री आकाश फुंडकर तसेच अहील्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे विशेष आभार व्यक्त करण्यात आले.

> **''बांधकाम कामगारांसाठीच्या शासकीय योजनांचा लाभ देताना ऑनलाईन प्रक्रियेसाठी केवळ अधिकृत फीच आकारावी. त्याव्यतिरिक्त जादा रक्कम घेणे चुकीचे असून असे प्रकार तात्काळ थांबवावेत. यापुढे कष्टकरी कामगारांवर होणारा अन्याय खपवून घेतला जाणार नाही.''**
>
> **-आमदार काशिनाथ दाते सर**
> **(विधानसभा सदस्य)**

या कार्यक्रमास जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत, तालुका राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला उपाध्यक्षा जयश्री शिंदे यांसह विविध मान्यवर उपस्थित होते. मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या बांधकाम कामगारांनी या उपक्रमाचे स्वागत करत समाधान व्यक्त केले. हा उपक्रम म्हणजे केवळ प्रमाणपत्र वाटप नसून, कष्टकरी कामगारांच्या सन्मानाचा आणि त्यांच्या हक्कांच्या जाणीवेचा एक महत्त्वाचा टप्पा ठरत असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

## शॉर्ट सर्किटमुळे आग; मोसंबी बाग व सिंचन साहित्य जळून खाक

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–**तालुक्यातील अंतरवाली खांडी शिवारात मंगळवारी दुपारी सुमारे ३ वाजेच्या सुमारास शॉर्ट सर्किटमुळे लागलेल्या आगीत शेतातील मोसंबी बाग आणि सिंचनासाठी ठेवलेले साहित्य जळून खाक झाले. या घटनेमुळे शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अंतरवाली खांडी येथील शेतकरी रमेश दगडू कळमकर यांच्या गट क्रमांक ३७ मधील सुमारे साडेपाच एकर शेतीत मोसंबीची बाग लागवड करण्यात आली होती. याच ठिकाणी ठिबक सिंचनाचे साहित्य व पाइपलाइन ठेवण्यात आली होती. दरम्यान, शेतावरून जाणाऱ्या वीज तारांमध्ये झालेल्या घर्षणामुळे ठिणग्या पडून आग लागल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या आगीत मोसंबीची सुमारे ३५ झाडे जळून खाक झाली असून, दोन चिंचेची झाडेही आगीत भस्मसात झाली.

तसेच पाइपलाइनचे सुमारे २० तुकडे आणि जवळपास दोन एकर क्षेत्रातील ठिबक सिंचन साहित्य जळून गेले आहे. या दुर्घटनेत शेतकऱ्याचे अंदाजे दीड लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे सांगितले जात आहे. घटनेची माहिती मिळताच संबंधित विभागाच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. दरम्यान, बाधित शेतकऱ्याने प्रशासनाकडे नुकसान भरपाईची मागणी केली आहे.

## संत गोरोबा काका समाधी सोहळा उत्साहात



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरातील कुंभार गल्ली, नालेगाव येथे संत गोरोबा काका समाधी सोहळा दरवर्षीप्रमाणे यंदाही मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. या निमित्ताने विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले असून भाविकांनी मोठ्या श्रद्धेने सोहळ्यात सहभाग नोंदविला.

या सोहळ्याचे विशेष आकर्षण म्हणजे आयोजित करण्यात आलेले आरोग्य शिबिर होय. स्थानिक नागरिकांसाठी मोफत आरोग्य तपासणी व मार्गदर्शन करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत या उपक्रमामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले. तसेच विविध कीर्तन, भजन व धार्मिक कार्यक्रमांमुळे वातावरण अधिकच भारावून गेले. कार्यक्रमास नगर शहराचे लाडके आमदार संग्राम भैय्या जगताप तसेच पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे यांनी उपस्थित राहून सोहळ्याची शोभा वाढविली. त्यांच्या उपस्थितीमुळे आयोजकांचा उत्साह दुपटीने वाढला. मान्यवरांनी संत परपरेचे महत्त्व अधोरेखित करत अशा कार्यक्रमांमुळे समाजात एकात्मता वाढते, असे मत व्यक्त केले.

यावेळी आमदार संग्राम भैय्या जगताप यांनी आपल्या भाषणात सांगितले की, संत गोरोबा काका यांची शिकवण ही समाजाला एकत्र आणणारी आणि माणुसकीची जाणीव करून देणारी आहे. अशा धार्मिक सोहळ्यांमुळे समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण होते आणि तरुण पिढीला संस्कारांची दिशा मिळते. पुढील काळातही अशा उपक्रमांना सर्वतोपरी सहकार्य राहील, असे आश्वासन त्यांनी दिले.

कुंभार गल्ली समितीचे अध्यक्ष जयकुमार शिवाजी सुसरे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, हा सोहळा केवळ धार्मिक नसून सामाजिक एकात्मतेचे प्रतीक आहे. सर्व समाजबांधवांच्या सहकार्यामुळेच हा कार्यक्रम यशस्वी होत असून पुढील काळातही अधिक भव्य स्वरूपात सोहळा आयोजित करण्याचा मानस आहे. नागरिकांनी दिलेल्या प्रतिसादाबद्दल त्यांनी आभार मानले.

या कार्यक्रमासाठी जयकुमार सुसरे, राहुल देवतरसे, नितीन राजापूरे, अमित देवतरसे, अजिंक्य देवतरसे, सागर राजापूरे, राजू राजापूरे, अमोल राजापूरे, गोरख राजापूरे, राजेंद्र शिंदे, किरण कदम, युवराज देवतरसे, अतुल देवतरसे, अक्षय राजापूरे, अक्षय देवतरसे, लोटके, प्रणव लाटणे, अमित टकले, भाऊसाहेब गोरे, किरण कुलकर्णी, सुरज शहाणे, प्रथमेश दळवी, कुणाल पाटील, अमित पाटील, मिलिंद देवगुणे, मयुर सांगळे, राजेंद्र शिरसाठ आदींनी विशेष परिश्रम घेतले.

## राज्यस्तरीय वाचन संस्कृती साहित्य पुरस्काराने कथालेखक बाळासाहेब देशमुख सन्मानित



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** वाचन संस्कृती प्रतिष्ठानचे राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार वितरण श्रीरामपूर इंदिरानगर येथे झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ह भ प डॉ. पुरुषोत्तम कोळपकर हे होते.

अध्यक्ष स्थानावरून बोलताना ह भ प डॉ. पुरुषोत्तम महाराज कोळपकर म्हणाले.

साहित्यिक डॉ. बाबुराव उपाध्ये हे साहित्यिक साधना करत, तिला जीवननिष्ठा मानून, राज्यभरातील गुणी साहित्यिकांना प्रतिष्ठान तर्फे साहित्य पुरस्कार प्रदान करते.

त्यांच्या निरपेक्ष वृत्तीतून आजवर अनेक नवोदित लेखकांनी भरीव वाटचाल करत , साहित्यामध्ये आपला नावलौकिक केलेला आहे. प्रतिष्ठानचे हे कार्य राज्यात सदैव प्रेरणादायी व दिशादर्शक ठरेल. याप्रसंगी व्यासपीठावर माजी प्राचार्य टी.ई. शेळके, ह भ प दत्तात्रय औताडे, साहित्यिक श्री सुखदेव सुकळे, प्रा. शिवाजी काळे हे होते.

प्रारंभी श्रीसंत गोरा कुंभार यांच्या पुण्यतिथी निमित्त प्रतिमापूजन व दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.बाबुराव उपाध्ये यांनी केले. व्यासपीठावरील मान्यवरांच्या शुभहस्ते, विजेत्यांना राज्यस्तरीय पुरस्कार देण्यात आले. कथालेखक कथाकथनकार श्री बाळासाहेब देशमुख यांना प्रा. एकनाथ आवटी ज्येष्ठ साहित्यिक यांच्या शुभहस्ते, राज्यस्तरीय वाचन संस्कृती सर्वोत्कृष्ट ग्रंथ निर्मिती पुरस्कार.. रंग माझा वेगळा कथासंग्रहास देऊन सन्मानित करण्यात आले. बाळासाहेब देशमुख यांचे आजवर रंग माझा वेगळा, माणसे अशी.. अन् तशीही.., माणसे भिंगातून इत्यादी कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. आजवर अहिल्यानगर जिल्ह्यात कथाकथनाचे पाचशे प्रयोग पूर्ण करत, राज्यस्तरा वर सत्तावीस कार्यक्रम झालेले आहेत. त्यांच्या कथांचे, विविध आकाशवाणी केंद्रावर, १२० प्रयोग प्रसारित झालेले आहेत.. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विलासराव तुळे यांनी,तर आभार प्रदर्शन डॉ. रामकृष्ण जगताप यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रा. शिवाजी काळे, नितीन जोर्वेकर, सौ. प्रा. संगीता फासाटे कटारे, सौ.मंदाकीनी उपाध्ये, गणेशानंद उपाध्ये यांनी बहुमोल सहकार्य केले.

## उद्योजक दिपक मोढवे यांच्याकडून जनता विद्यालय दोन स्मार्ट बोर्डची भेट



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जनता विद्यालय, रुईछत्तीशी. ता. नगर या विद्यालयास पुणे येथील उद्योजक श्री दिपक मोढवे पाटील यांनी दोन स्मार्ट बोर्ड ची भेट दिली. याप्रसंगी जिल्हा मराठा संस्थेचे सहसचिव मुकेश मुळे उपस्थित होते.

दिपक मोढवे पाटील हे जनता विद्यालयाचे माजी विद्यार्थी असून खुंटेफळ ता. आष्टी जिल्हा बीड येथील रहिवासी आहेत. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेऊन पुणे या ठिकाणी ई सी आर एस एक्झिक्यूटिव्ह कार रेंटल सर्विसेस या कंपनीची स्थापना करून यशस्वीरित्या व्यवसाय करत आहेत. या सर्व जडणघडणीमध्ये जनता विद्यालयाचा सिंहाचा वाटा असल्याचे श्री मोढवे यांनी सांगितले. याच विद्यालयात शिक्षण घेतले, याच विद्यालयाने घडवले मोठे केले त्याबद्दल शाळेचे व शिक्षकांचेही ऋण त्यांनी व्यक्त केले. ज्या शाळेने घडवले, मोठे केले त्या शाळेचे आपण काहीतरी देणे लागतो या भावनेतून विद्यालयाला दोन स्मार्ट बोर्ड भेट देत असून यापुढील काळातही विद्यार्थी व विद्यालयाच्या प्रगतीसाठी प्रयत्नशील असणार आहे असे सांगितले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही आधुनिक व दर्जेदार शिक्षण मिळावे, विद्यार्थ्यांची प्रगती व्हावी या हेतूने स्मार्ट बोर्ड भेट देत असल्याचे सांगितले.

विद्यालयास स्मार्ट बोर्ड भेट दिल्याबद्दल विद्यालयाच्या वतीने जिल्हा मराठा संस्थेचे सहसचिव श्री मुकेश मुळे यांच्या हस्ते दिपक मोढवे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य श्री मनोहर करांडे, विद्यालयाचे प्राचार्य श्री दत्ता नारळे, पर्यवेक्षिका ताराबाई पाडळकर,श्री दिनकर मुळे, कैलास कोरके, दादासाहेब महारनवर,सुनील जगदाळे स्वाती हरिश्चंद्रे, उल्का गुंड, कविता उगले आदी मान्यवर उपस्थित होते.

